सकाळ

जळगाव, शुक्रवार, २० नोव्हेंबर २०२६ ७

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
पर्यावरणविषयक जाहीर लोक सुनावणीची सूचना

नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्प, ता. सुरगाणा, जि. नाशिक यांच्यामार्फत नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाकरिता पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याचा प्रस्ताव नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्प, ता. सुरगाणा, जि. नाशिक यांचेकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेला आहे.

भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्र. एस. ओ. १५३३, दि.१४/०९/२००६ (दिनांक ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टीका-टीप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

सदर प्रकल्पांच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणाऱ्या संस्था, विस्थापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना सूचना, टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी तसेच लेखी स्वरूपात नोंदविता येतील. लेखी स्वरूपात सूचना ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात, तसेच कार्यालयातील शाखेमध्ये जनसुनावणीच्या अगोदर लेखी किंवा तोंडी आपल्या आवाजात रेकॉर्ड करून ई-मेल:- srojalgaon1@mpcb.gov.in वर सादर करू शकतात किंवा जनसुनावणीच्या वेळी आपले निवेदन सादर करू शकतात.

उप-प्रादेशिक कार्यालय,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, हॉल "ए"
३ रा मजला, जुने बी.जे. मार्केट, जळगाव,
जळगाव - ४२५००१. दूरध्वनी क्र. ०२५७-२२२१२८८ ई-मेल:- srojalgaon1@mpcb.gov.in

तसेच तोंडी अथवा लेखी स्वरूपातील सूचना खालील ठिकाणी जाहीर लोकसुनावणी वेळेत केल्या जाऊ शकतात. या अनुषंगाने नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्प, ता. सुरगाणा, जि. नाशिक यांच्या प्रस्तावित नारपार गिरणा नदी जोड प्रकल्प यांच्या आंतरखोरे जलसंपदा विकास प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आलेली आहे.

लोकसुनावणीचे ठिकाण : अंतोदय सभागृह, सिग्नल पॉइंट,
छत्रपती शिवाजी महाराज चौक, चाळीसगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव.
लोकसुनावणीची दिनांक : दि. २१/१२/२०२६
लोकसुनावणीची वेळ : दुपारी १२:०० वाजता

सदर जाहीर लोकसुनावणीशी संबंधीत माहिती असलेले दस्ता ऐवज खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध करण्यात आलेले असून, कार्यालयीन वेळेमध्ये संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगाव.
४) उप-विभागीय कार्यालय, पाचोरा, चाळीसगांव, जि. जळगाव.
५) तहसील कार्यालय, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव, जि. जळगाव.
६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, पाचोरा, भडगाव, चाळीसगांव जि. जळगाव.
७) तलाठी, तलाठी कार्यालय, पाचोरा, भडगांव, चाळीसगाव जि. जळगाव.
८) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, हॉल "ए",
३ रा मजला, जूने बी. जे. मार्केट, जळगाव, जळगाव - ४२५००१.
९) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन,
त्र्यंबकरोड, आयटीआयजवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
१०) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
११) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
१२) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळमजला, इस्ट विंग, नवीन सचिवालय इमारत,
सिव्हिल लाइन्स, नागपूर-४४०००१. सदरील जाहीर लोकसुनावणीबाबतची सूचना ही मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या मान्यतेने देण्यात येत आहे.

उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगाव.